

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

चित्तपावन मित्र









वर्ष ४८ वे
अंक ११ वा
१० नोव्हेंबर २०२६
किंमत १ रुपया



सर्व सभासद, वाचक व हितचिंतकांना

दीपावली निमित्त आनंदमयी शुभेच्छा...!

श्री परशुराम भवन येथील अष्टमी पूजनाची क्षणचित्रे...






भोंडल्याच्या कार्यक्रमाची क्षणचित्रे...




अष्टमी उत्सव २०२६ दिमाखात संपन्न....

ज्या शक्तीने ''एकोहम् बहुस्याम प्रजायेय'' या स्फुरणाने अवघं सृजन साकारलं त्या शक्तीला मूर्ती रूपात घडवणं हाही एक भावगर्भ सृजन सोहळाच नाही कां.. असाच भावगर्भी दरवर्षी अनुभवायला मिळतो.

असा हा दिमाखदार सोहळा या वर्षी रविवार दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ या दिवशी संपन्न झाला. आपल्या चित्तपावन संघाच्या डॉ. बापये सभागृहात महालक्ष्मीचा उत्सव अतिशय दिमाखदार स्वरूपात झाला. नेहमीप्रमाणेच पूजा सकाळी दहा वाजता संपन्न झाली. श्री. वैभव जोगळेकर यांनी पौरोहित्य केले.. त्यानंतर संध्याकाळी सातच्या सुमारास देवीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. आरती झाल्यानंतर दर्शनासाठी व्यवस्थित रांगेने सुरुवात झाली.



शिप्रा सहस्त्रबुद्धे यांनी तांदुळाच्या पिठीचा देवीचा मुखवटा साकारला. एकीकडे पौरोहित्य वर्गाच्या महिलांनी श्रीसूक्ताचे पठण केले. त्यानंतर भाविकांनी आपली गायनसेवा सादर करून माहोल भावभक्तीने भारून टाकले. अनेक महिलांनी रितीप्रमाणे घागरी फुंकल्या. रात्री बारा नंतर आरती करून हा सोहळा संपन्न झाला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री. संविद जोगळेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संध्याकाळपासून दर्शनाचे लाईव्ह चित्रीकरण विनामूल्य फेसबुक मार्फत पोहोचवले. संस्थेच्या वतीने त्याचे आभार.

संस्थेचे सभासद, नाशिकचे प्रसिद्ध शिल्पकार श्री. संदीप लोंढे यांनी श्री महालक्ष्मीची फायबर मूर्ती विनामूल्य सेवा म्हणून दिली. संस्थेच्या वतीने श्री. संदीप लोंढे यांचा संस्थेचे अध्यक्ष मा. विजय साने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच महालक्ष्मीच्या मागे लावलेले डेकोरेशन श्री. सी. एल. कुलकर्णी व सौ. माधुरी कुलकर्णी यांनी संस्थेस भेट दिले. संस्थेकडून त्यांचेही आभार.

तसेच या वर्षी संस्थेच्या वतीने छोटे उद्योग करणाऱ्यांसाठी निरनिराळे स्टॉल्स् उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यालाही सर्वांनी भरभरून प्रतिसाद दिला. एकूण १७ स्टॉल्स् होते. कार्यक्रमाला सगळ्यांचा हातभार लागलेला असतो. भोजन व्यवस्थेसाठी निलेश गोखले यांनी सहकार्य केले. संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच सर्व महिला, ऑफिस स्टाफ, पतसंस्थेचे सदस्य, स्टाफ या सर्वांचे सहकार्य लाभले.

स्नेहबंध चा भोंडला उत्साहात साजरा

सालाबादप्रमाणे दि. १३ ऑक्टोबर रोजी (स्नेहबंध मैत्रिणींचा) महिला मंडळाचा भोंडला मोठ्या दिमाखात पार पडला. मंगल जोगळेकर यांनी प्रास्ताविक करून भोंडल्याबद्दल माहिती सांगितली. भोंडला, हदगा अश्विन प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत खेळला जातो. त्या वेळी हत्तीची पूजा केली जाते. आता हत्तीच का? तर हत्ती हे लक्ष्मीचे प्रतिक मानले जाते आणि नवरात्रात अवकाशात देवीतत्वाचे प्राबल्य असते. म्हणून हत्ती....

चौरंगावर सजवलेल्या हत्तीची छोट्या मुलींकडून पूजा करून हार, फुले अर्पून, ओवाळून मग हत्तीभोवती फेर धरून सर्वंनी पारंपारिक गाणी म्हटली. गाण्यानंतर खिरापत ओळखण्याची चढाओढ सुरू झाली. खूप मैत्रिणींनी घरूनच खिरापती आणल्या होत्या. सगळ्यांच्या खिरापतींनी ओवाळून मग सगळ्यांनी त्याचा आस्वाद घेतला. संस्थेकडून चुरमुऱ्याचे लाडू आणि कचोरी होती. बाकी मक्याच्या चिवडा, चॉकलेट, शिंगाड्याच्या शेवेचा चिवडा, चिक्की, काकडीचे, उपवासाचा चिवडा, क्रीम बिस्कीट असा भरपूर खिरापतीचा खाऊ होता.

* सामुहिक बोडण *

आपल्या चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे रविवार, दि. १३ डिसेंबर २०२६ रोजी सामुहिक बोडण करणार आहोत. ज्यांना कोणाला बोडण भरायचे असेल त्यांनी आपली नांवे खाली दिलेल्या संपर्क क्रमांकांवर नोंदवावीत. अधिक माहिती नंतर देण्यात येईल.

चित्तपावन ब्राह्मण संघ – फोन नंबर : ०२५३-२५७६२४१ – सकाळी : १०:०० ते ०१:०० आणि दुपारी ०४:०० ते ०७:००

श्री. श्रीधर परांजपे आणि श्री. सुमित गोखले यांची जलतरण स्पर्धेत चमकदार कामगिरी



श्री. श्रीधर परांजपे

महाराष्ट्र राज्य स्टेट वेटरन्स ॲक्वॉटिक असोसिएशन आणि जळगाव जिल्हा प्रौढ जलतरण असोसिएशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २७ वी राज्य स्तरीय प्रौढ जलतरण स्पर्धा दि. ३ व ४ ऑक्टोबर २०२६ रोजी एकलव्य क्रिडा संकुल जलतरण तलाव, जळगाव येथे पार पडली. या स्पर्धेत आपल्या संस्थेचे सभासद श्री. श्रीधर परांजपे आणि श्री. सुमित गोखले यांनी सहभाग घेतला. श्रीधर परांजपे यांनी त्यांच्या वयोगटात (८० आणि पुढे) ५० मीटर बॅक स्ट्रोक मध्ये सुवर्ण पदक आणि ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये कांस्य पदक जिंकले.

श्री. सुमित गोखले यांनी त्यांच्या वयोगटात (४५ – ४९) ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये कांस्य पदक आणि ४ x ५० मीटर रिले मध्ये सुवर्ण पदक जिंकले. श्री. श्रीधर परांजपे आणि श्री. सुमित गोखले यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन.



श्री. सुमित गोखले

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

इमारत निधी नोव्हेंबर २०२६ - देणगीदार

कै. र. के. पटवर्धन स्मृती श्री परशुराम भवन प्रकल्पासाठी नोव्हेंबर २०२६ मध्ये जमा झालेल्या देणग्या

क्रमांक	देणगीदाराचे नाव	देणगी रक्कम
०१	श्री. अजित रामचंद्र कुंटे (कै.पद्मा अशोक (साठे) कुंटे यांच्या स्मरणार्थ)	७,५०,०००/-

शैक्षणिक निधी नोव्हेंबर २०२६ - देणगीदार

०२	श्रीमती वसुधा वासुदेव घारे (कै.वासुदेव परशुराम घारे यांच्या स्मृती निमित्त शैक्षणिक मदत)	१५,०००/-
०३	श्री. चैतन्य मुकुंद गांगल (शैक्षणिक मदत – गणित विषय)	१,०००/-
०४	सौ. निलम सागर टकले (शैक्षणिक मदत – गणित विषय)	१,०००/-

अष्टमी पूजन २०२६ देणगीदार

क्रमांक	देणगीदाराचे नाव	देणगी रक्कम
०१	श्री. निलेश नरहरी जोशी	५,५००/-
०२	सौ. धनदा देवधर	५,०००/-
०३	सौ. मेधा चाफेकर	२,५००/-
०४	सौ. मेधा पटवर्धन	१००१/-
०५	श्री. विनोद जोशी	१००१/-
०६	श्रीमती दीपा भागवत	१००१/-
०७	कु. देवगंधा भागवत	१००१/-
०८	श्री. अरूण जोशी	१०००/-
०९	श्री. निरंजन सोमण	१०००/-
१०	श्री. मुकुंद गांगल	१०००/-
११	सौ. नीलम टकले	१०००/-

क्रमांक	देणगीदाराचे नाव	देणगी रक्कम
१२	सौ. जास्वंदी दांडेकर	५११/-
१३	सौ. अकल्पिता अभ्यंकर	५०१/-
१४	सौ. शोभा पंडीत जोशी	५०१/-
१५	श्री. मंदार गोडबोले	५०१/-
१६	श्री. वसंत पटवर्धन	५००/-
१७	सौ. मधुरा दिनेश रानडे	२५१/-
१८	सौ. सरोज गाडेकर	२५१/-
१९	सौ. भावना दिनेश पाठक	२०१/-
२०	सौ. प्रिया प्रसाद मराठे	२०१/-
२१	सौ. साधना अविनाश गाडगीळ	१०१/-
२२	श्री. भालचंद्र कर्वे	१००/-

अंबेजोगाई व परळी वैजनाथ दर्शन सहल



आपल्या अनेक सभासदांकडून गेल्या अनेक दिवसांपासून अंबेजोगाई सहलीचे आयोजन करण्याबाबत विचारणा होत होती. सभासदांच्या या विनंतीला मान देऊन आपण शनिवार व रविवार, दिनांक ५ व ६ डिसेंबर २०२६ रोजी अंबेजोगाई व श्री परळी वैजनाथ दर्शन सहलीचे आयोजन केले आहे.

ही सहल आपल्या सभासदांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आयोजित केली आहे. आपण सर्वांनी एक कुटुंब म्हणून एकत्र प्रवासाचा आनंद घ्यावा, हा या सहलीच्या आयोजनामागील मुख्य उद्देश आहे. त्यासाठी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

प्रस्थान व प्रवास :–

सहल शनिवार, दिनांक ५ डिसेंबर रोजी सकाळी ठीक ५.३० वाजता श्री परशुराम भवन, सीबीएस येथून सुरू होईल. त्यानंतर बस बिटको चौक येथे नाशिकरोड सभासदांच्या सोयीसाठी फक्त प्रवेश घेण्यासाठी थांबेल, वाटेत कुठेही थांबणार नाही. अंतर लांबचे असल्यामुळे वाटेत अन्य कोणताही थांबा घेणे शक्य होणार नाही. अंदाजे सकाळी ६ वाजता तेथून पुढील प्रवास सुरू होईल. प्रवासासाठी ए. सी. बस ची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्वांनी वेळेचे काटेकोर पालन करावे, ही विनंती.

नावनोंदणी व बुकिंग :–

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार प्रथम ५० सभासद बंधू भगिनींची नाव नोंदणी केली जाईल. संपूर्ण बुकिंग रक्कम भरल्यानंतरच नाव निश्चित समजले जाईल.

नाव नोंदणी संस्थेच्या श्री परशुराम भवन येथील ऑफिसमध्ये करावी लागेल. वेळ सोमवार ते शनिवार सकाळी १० ते १ व दुपारी ४ ते ६ पर्यंत. जाण्याआधी ०२५३–२५७६२४१ अथवा मोबाईल ८३२९८९६८७८ वर कॉल करुन गेल्यास उत्तम. **फोन वर बुकिंग घेतले जाणार नाही.**

मुलांसाठीचे नियम :–



पाच वर्षांवरील मुलां–साठी पूर्ण शुल्क आकारले जाईल. पाच वर्षांखालील मुलांसाठी स्वतंत्र सीट उपलब्ध करून देता येणार नाही. स्वतंत्र सीट आवश्यक असल्यास पूर्ण सीटचे बुकिंग करावे लागेल. प्रवासासाठी ए. सी. बसची व्यवस्था असेल.

प्रवासातील भोजन व चहा–नाश्ता :–

प्रवासादरम्यान चहा, नाश्ता, जेवण , दुपारचा चहा व रात्री चे जेवण यांची व्यवस्था असेल. ५ तारखेला साधारण संध्याकाळी ७.३० वाजेपर्यंत आपण मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचू.

निवास व्यवस्था :–

मुक्कामासाठी ए. सी. हॉटेलची व्यवस्था करण्यात आली आहे. एका खोलीत दोन व्यक्तींच्या निवासाची सोय असेल. रात्रीच्या जेवणाची व्यवस्था हॉटेलमध्येच असेल.

दिवसाचे नियोजन :–

शनिवारी साधारण चार वाजेपर्यंत परळीला पोहचून श्री वैजनाथाचे दर्शन घेऊन मुक्कामी म्हणजे अंबेजोगाई येथे संध्याकाळी ७.३० वाजेपर्यंत पोहोचू, रात्रीचे जेवण व आराम.

रविवारी सकाळी लवकर चहा, नाश्ता व तद्नंतर, देवीची पूजा व अभिषेक केल्यानंतर, साधारण ११.३० वाजता जेवण झाल्यानंतर दुपारी १ वाजता नाशिककडे परतीचा प्रवास सुरू होईल. साधारण रात्री ११ वाजेपर्यंत नाशिकला पोहोचण्याचे नियोजन आहे. रविवार, रात्रीचे जेवण प्रवासात पॅक फूड असेल.

बुकिंग शुल्क व आवश्यक कागदपत्रे :–

बुकिंगच्या वेळी प्रत्येक व्यक्तीमागे रू. ३,०००/– (अक्षरी रुपये तीन हजार फक्त) जमा करावे. तसेच आधार कार्डाची एक झेरॉक्स प्रत देणे आवश्यक आहे. आधार कार्डाची झेरॉक्स प्रत दिल्याशिवाय, केवळ पैसे भरून बुकिंग निश्चित केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

संस्थेचा आपुलकीचा निर्णय :-

या सहलीसाठी प्रतिव्यक्ती एकूण खर्च साधारण रू. ६,५००/- अपेक्षित आहे. मात्र, आपण ही सहल केवळ पर्यटन म्हणून नव्हे, तर आपल्या सभासदांनी व त्यांच्या कुटुंबियांनी एकत्र येऊन आनंदाचे क्षण अनुभवावेत, या कौटुंबिक भावनेतून आयोजित करीत आहोत. त्यामुळे प्रत्येक सभासदाकडून रु. ३,०००/- इतकीच रक्कम घेतली जाईल आणि उर्वरित खर्च, साधारण रु. ३,५००/- प्रतिव्यक्ती, संस्था स्वतः भरेल आपल्या सर्वांच्या सहकार्याने ही सहल आनंददायी, संस्मरणीय आणि आपुलकीचे नाते अधिक दृढ करणारी ठरेल, असा विश्वास आहे.

ह्या सहलीत आपण फक्त अंबेजोगाई व श्री परळी वैजनाथ ह्यांचेच नियोजन केले आहे. चला तर मग, अंबेजोगाई देवीचा आशीर्वाद आणि श्री परळी वैजनाथाचे दर्शन घेण्यासाठी एकत्र येऊया !

धन्यवाद...!

***

RANKERS GALAXY
"Learn today, Lead tomorrow"
ADMISSION OPEN
Subject: Biology
- Regular Board (HSC, ICS, A and As level)
- Entrance preparation NEET and MH-CET
- NEET Repeater course

Grade 9th and 10th
ICSE, CBSE and Cambridge (IGCSE)
Biology & Environmental Science
Contact Details
Mr. Ketan Patwardhan (Mob No.: 9922781035)
Address: Rankers Galaxy, Thakkar's Majesty, Behind Burger King, College Road. Nasik
Website: rankersgalaxy.in



भावपूर्ण श्रद्धांजली...

– आपल्या संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य श्री. चंद्रशेखर रानडे यांच्या मातोश्री श्रीमती विजया विश्वनाथ रानडे यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने सोमवार, दिनांक ०५/१०/२०२६ रोजी सकाळी दुःखद निधन झाले. संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली...

भावपूर्ण श्रद्धांजली...



– आपल्या संस्थेचे सभासद कमांडर विनायक आगाशे यांचे शुक्रवार, दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. कमांडर आगाशे भारतीय नौदलाचे सन्मानित निवृत्त अधिकारी होते.

१९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात त्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता. या युद्धात भारतीय क्षेपणास्त्र असलेल्या नौकांच्या संरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर होती. आगाशे यांचे वडील सैन्य दलात होते व मुलगा वायुसेनेत विंग कमांडर आहे. कमांडर आगाशे संस्थेच्या प्रत्येक कार्यक्रमात उपस्थित असायचे व संस्थेच्या उपक्रमांची आस्थेने विचारपूस करीत असत. कमांडर आगाशे यांना संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली...

भावपूर्ण श्रद्धांजली...



– आपल्या संस्थेच्या सभासद व नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या सागरमल मोदी शाळेच्या निवृत्त शिक्षिका श्रीमती सुलभा पाटणकर यांचे शनिवार, दि.२४ ऑक्टोबर २०२६ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली...



चित्तपावन ब्राह्मण संघ,नाशिक

''चित्तपावन महिला मंडळ''

स्नेहबंध मैत्रिणींचा

चौदावा वर्धापन दिन

नमस्कार मैत्रिणींनो,

'माझे जीवन गाणे'

प्रत्येक व्यक्ती जीवनात सुख-दुःखाचे गाणे गात जगत असतो. कधी ते गाणं, आनंद लहरी निर्माण करते तर कधी निराशेचे सूर आळवते. संगीताने जिच्या जीवनाचे आकाश व्यापून टाकले आहे अशी **गायिका स्वरांगी मराठे** व पिडीतांच्या जीवनात आशेचा सूर निर्माण करणारे **करंदीकर दाम्पत्य** आपल्या भेटीला येत आहेत. अर्थातच.... निमित्त आहे आपल्या मंडळाचा वर्धापन दिन....!

मैत्रिणींनो, आपल्या 'स्नेहबंध मैत्रिणींचा' ह्या मंडळाचा १४ वा वर्धापन दिन शनिवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२६ रोजी साजरा करणार आहोत. सर्व मैत्रिणींनी सदर कार्यक्रमास अवश्य यावे.

सत्कारार्थी

प्रमोद करंदीकर (संस्थापक सदस्य)

वृषाली करंदीकर (सचिव)

शबरी सेवा समिती

प्रमुख अतिथी

स्वरांगी मराठे

गायिका व अभिनेत्री

निमंत्रक

मंगल जोगळेकर मैथिली गोखले सुवर्णा सहस्त्रबुद्धे

कार्यकारिणी सदस्या, चित्तपावन ब्राह्मण संघ


कार्यक्रम स्थळ :- श्री परशुराम भवन, डॉ.बापये सभागृह (दुसरा मजला)


दिनांक व वेळ :- शनिवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वा.

कार्यक्रम वेळेवर सुरू होईल.

कार्यक्रमानंतर अल्पोपहाराचा आस्वाद सर्वांनी घ्यावा.

अष्टमी निमित्त झालेले भोंडला पूजन





आपल्या मासिकात जाहिरात द्या...! – आपले चित्तपावन मित्र मासिक सुमारे २२०० सभासद आणि कुटुंबियांपर्यंत प्रत्यक्ष आणि सुमारे ५०० सभासदांना ईमेल वर पोहोचते. आपल्या व्यवसाय/आस्थापनांची जाहिरात अंकात द्या. त्या मार्गाने संस्थेला आर्थिक सहाय्य देखील होईल. जाहिरात दर पुढीलप्रमाणे

रंगीत पूर्ण पान	**रु. ३०००**	**रंगीत अर्धे पान**	**रु. २५००**
कृष्ण धवल पूर्ण पान	**रु. २०००**	**कृष्ण धवल अर्धे पान**	**रु. १५००**
कृष्ण धवल पाव पान	**रु. ७५०**	**(वर्षभराचे आगाऊ शुल्क भरल्यास १ महिना अधिक प्रसिद्धी).**	

जाहिरातीसाठी संपर्क : संस्थेचे कार्यालय ०२५३-२५७६२४१

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, स्टेट बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१

प्रति, _____

_____

_____

संस्थेची वेबसाईट :-

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- Website : www.nasikchitpavan.org
- http://facebook.com/nasikchitpavan
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.